REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 6 | MARCH - 2024

# नागपूर शहरात रस्त्यावर राहणाऱ्या मूलांच्या जीवनमानाचे आर्थिक अध्ययन

अंकेश साहू[1] , डॉ.सत्यप्रिय हि. इंदुरवाडे

[1]संशोधनकर्ता

[2]मार्गदर्शक , प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख ,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठनागपूर.

## सारांश



नागपूर शहर हे भारताचे केन्द्रस्थान असून जगाच्या नकाशावर महत्वाची भूमिका साकारणारे आहे. २०११ च्या जनगणणेनुसार नागपूर शहराची लोकसंख्या २५ लाखांपैक्षा जास्त आहे तेव्हा याला विकसीत करण्यासाठी त्या शहराच्या महत्वपूर्ण समस्या सोडविणे आवश्यक आहे. नागपूर शहर हे औद्योगिक शहर आहे नागपूर शहरात रोजगाराकरीता वा आकर्षण म्हणून अनेक मूले शहरात मग ती इतर राज्यातील वा आजूबाजूच्या क्षेत्रातील सुद्धा येतात आणि येथे येवून ते आपली आर्थिक बाजू सुधारविण्याचा प्रयत्न करतात. त्याचप्रमाणे ही मूले ज्या ठिकाणी मोठया प्रमाणात वास्तववाद राहतात ते म्हणजे रेल्वेस्टेशन बसस्थानक, उडाणपूल, मंदीर, गार्डन, मोठया प्रमाणात शहरात उपलब्ध आहेत. कारण बरेच राष्ट्रीय महामार्ग नागपूर ला जोडले आहेत त्यामूळे मालवाहक गाडयांची वाहतूक मोठया प्रमाणावर होते. तसेच मोठया बाजारपेठा जसे कळमणा मार्केट, संतरा मार्केट इतवारी असल्यामूळे यांच्या परीसरातील रस्त्यावर राहणाया मूलांची संख्या मोठया प्रमाणात आहे मध्य भारतातील महत्वपूर्ण असे रेल्वेस्थानक नागपूर शहरात असल्यामुळे त्या परीसरात सुद्धा अनेक मूलांचे वास्तव्य दिसून येते. तसेच वाढत्या उडाणपूलांच्या संख्यामुळे सुद्धा त्या पूलाखली राहणाऱ्या मूलांची संख्या मोठया प्रमाणात आहे म्हणून प्रस्तुत संशोधन कार्य करण्याकरीता या विषयाची नीवड करण्यात आली

## प्रस्तावना

रस्त्यावर राहणाऱ्या मूलांची समस्या ही फक्त एका शहारापूरती, राज्य या देशापूरती मर्यादीत नसून संम्पूर्ण जगाला या समस्येकडे लक्ष देणे गरजेचे आहे आणि त्या समस्या सोडवीण्यासाठी नवीन आर्थिक सामाजीक शैक्षणिक धोरण निर्माण करण्यासाठी आणि मुलांचे पूणर्वसन समस्या सोडवण्यासाठी या अभ्यास विषयाचे महत्व अधिक आहे.

राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर ही एक चिंताजनक समस्या आहे. याचे विविध अनेक पैलू आहे. या समस्येची अनेक कारणे आहेत. विशीष्ट अशी एक सामाजीक आर्थिक अशी एक पार्श्वभूमी आहेत एक साचेबद्ध वर्तूळ आहे या वर्तूळाच्या प्रवाहात प्रवेश करून ते वर्तूळाचे वलय नष्ट कराये आहे तशीच ती एक गरज सुद्धा आहे.

प्रस्तुत संशोधन हे विविध पैलू की ज्यामुळे मुलांच्या सामाजीकआर्थिक समस्या जाणून घेवून त्याच बरोबर त्या समस्या का निर्माण होतात याच्या खोलात जावून एक नवीन दिशा या रस्त्यावर राहणाऱ्या मूलांना देण्याचा प्रयत्न या संशोधनाच्या माध्यमातून प्रकाशीत होणाऱ्या साहीतयाच्या माध्यमातून राष्ट्रीय तसेच जागतीक सूद्धा या समस्या सोडविण्यास मोठा हामभार लागू शकतो

प्रस्तूत संशोधन हे नागपूर शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या मूलांच्या जीवनमानाची वैशीष्टये तसेच त्यांची शैली जीवन जगण्याची पद्धती त्या मूलांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यास सरकार कोणते धोरण निर्माण करता येईल या दृष्टिकोणातून सूद्धा संशोधनाचे महत्व अधिक आहेत.

अनेक संशोधकांनी आता पर्यंत बालमजून व त्यांच्या समस्या बरोजगारी मूलांचे मानसीक आरोग्य यासरख्या दृष्टीकोनातून अनेक संशोधन झाले आणि सरकारकडे मोठया प्रमाणात आकडेवारी उपलब्ध आहे मात्र रस्त्यावर राहणाऱ्या मूलासंबंधी कोणतेही आकडेवारी वा माहीती ते कूठे राहतात त्यांची जीवनशैली काय आहे ते आपले उपजीवीका कशी पूर्ण करतात याची माहीती या संशोधनातून प्राप्त होत असल्यामूळे नागपूर शहराच्या दृष्टीकोनातून खूप महत्वपूर्ण असे संशोधन आहे

प्रस्तुत संशोधनात नागपूर शहर निवडण्याचे कारण वर्तमान परीस्थीतीत विदर्भात वा संपूर्ण महाराष्ट्रात नागपूर झपाटयोन जलदगतीने औद्योगीकीकरण वाढत आहे आणि शहराच्या चहूभोवताल मोठया प्रमाणात ग्रामीण भाग असल्यामूळे अनेक मूले शहरात रस्त्यावर राहून आपली उपजीवीकाच्या शोधात असतात आणि नागपूर शहरात रस्त्यावर राहणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवसवाढत आहे.

वरील कारणास्तव प्रस्तूत संशोधनाची आवश्कता आहे

**सारणी क्रमांक १ : नागपूर शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे लिंग व त्यांच्या व्यसनाधीनते दरम्यान असलेल्या संबंधांचे विश्लेषण**

| **लिंग** | | **नशा करणे** | | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| | | **होय** | **नाही** | |
| **मुलगा** | निरिक्षण मूल्य | ३०९ | ५६ | ३६५ |
| | अपेक्षित मूल्य | २७९८. | ८५२. | |
| **मुलगी** | निरिक्षण मूल्य | ३६ | ४९ | ८५ |
| | अपेक्षित मूल्य | ६५२. | १९८. | |
| **एकूण** | | **३४५** | **१०५** | **४५०** |
| **Chi-square** | | **68.975** | | |
| **DF** | | **1** | | |
| **P-value** | | **<0.05** | | |
| **Critical Chi square value** | | **3.84** | | |

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये नागपूर शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचेलिंग व त्यांची व्यसनाधीनता या घटकांदरम्यान असलेल्या संबंधांच्या विश्लेषणाचे परिणाम दर्शविण्यात आले आहेप्रस्तुत सारणी ही द्वीचलय आहे. रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे लिंग हे स्वतंत्र चल असुन त्यांची व्यसनाधीनता हे अवलंबित चल आहे सारणी स्वतंत्र व अवलंबित या दोन्ही चलांना प्रत्येकी दोन गटात विभागण्यात आले आहे. नागपूर शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे लिंग व त्यांची व्यसनाधीनता या चलांदरम्यान असलेल्या संबंधांचा आढावा काई वर्ग चाचणीच्या मदतीने घेतला असता असे निदर्शनास आले की, सारणी १ स्वतंत्र्यांशावर काई वर्ग मुल्य६८.९७५ असुन १ स्वातंत्र्यांश व०.०५ सार्थकता स्तरावर मानक काई वर्ग मुल्य ३.८४ आहे. वरील माहिती वरून हे स्पष्ट होते की सारणीतील काई वर्ग मुल्य हे मानक काई वर्ग मुल्यापेक्षा अधिक आहे यावरून नागपूर शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे लिंग व त्यांची व्यसनाधीनता या चलांदरम्यान महत्वपूर्ण संबंध असल्याचे स्पष्ट होते

**सारणी क्रमांक २: नागपूर शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे लिंग व त्यांची दररोजची कमाई या घटकांदरम्यान असलेल्या संबंधांचे विश्लेषण**

| लिंग | | दररोजची कमाई | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रुपेक्षा २०. कमी | रुते २१. ४० | ४१ ते ६० | रुते ६१. ८० | रुते ८१. १०० | रु. पेक्षा १०० अधिक | एकूण |
| मुलगा | निरिक्षण मूल्य | ४१ | ५२ | १०२ | १०५ | २० | ४५ | ३६५ |
| | अपेक्षित मूल्य | ५६८. | ४७९. | १००६. | १०१४. | २१९. | ३६५. | |
| मुलगी | निरिक्षण मूल्य | २९ | ७ | २२ | २० | ७ | - | ८५ |
| | अपेक्षित मूल्य | १३२. | १११. | २३४. | २३६. | ५१. | ८५. | |
| **एकूण** | | **७०** | **५९** | **१२४** | **१२५** | **२७** | **४५** | **४५०** |
| **Chi-square** | | **37.251** | | | | | | |
| **DF** | | **5** | | | | | | |
| **P-value** | | **<0.05** | | | | | | |
| **Critical Chi square value** | | **11.07** | | | | | | |

वरील सारणी क्रमांक २ मध्ये नागपूर शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचेलिंग व त्यांची दररोजची कमाई या घटकांदरम्यान असलेल्या संबंधांच्या विश्लेषणाचे परिणाम दर्शविण्यात आले आहेप्रस्तुत सारणी ही द्विचलीय आहे. रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे लिंग हे स्वतंत्र चल असुन त्यांची दररोजची कमाई हे अवलंबित चल आहेसारणीत स्वतंत्रव अवलंबित या दोन्ही चलांना अनुक्रमे दोन व सहा गटात विभागण्यात आले आहे. नागपूर शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे लिंग व त्यांची दररोची कमाई या चलादरम्यान असलेल्या संबंधांचा आढावा काई वर्ग चाचणीच्या मदतीने घेतला असता असे निदर्शनास आले की सारणीत ५ स्वतंत्र्यांशावर काई वर्ग मुल्य ३७.२५१असुन ५ स्वातंत्र्यांश व०.०५ सार्थकता स्तरावर मानक काई वर्ग मुल्य ११.०७ आहे. वरील माहिती वरून हे स्पष्ट होते की, सारणीतील काई वर्ग मुल्य हे मानक काई वर्ग मुल्यापेक्षा अधिक आहे यावरून नागपूर शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचेलिंग व त्यांची दररोजची कमाई या चलांदरम्यान महत्वपूर्ण संबंध असल्याचे स्पष्ट होते

**सारणी क्रमांक ३: नागपूर शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे लिंग वत्यांना परत शिकायची संधी मिळाली तर शिकणार का ?या घटकांदरम्यान असलेल्या संबंधांचे विश्लेषण**

| लिंग | | परत शिकायची संधी मिळाली तर तुम्ही शिकणार का | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | |
| मुलगा | निरिक्षण मूल्य | १८ | ३४७ | ३६५ |
| | अपेक्षित मूल्य | ४४६. | ३२०४. | |
| मुलगी | निरिक्षण मूल्य | ३७ | ४८ | ८५ |
| | अपेक्षित मूल्य | १०४. | ७४६. | |
| **एकूण** | | **५५** | **३९५** | **४५०** |
| **Chi-square** | | **95.74** | | |
| **DF** | | **1** | | |
| **P-value** | | **<0.05** | | |
| **Critical Chi square value** | | **3.84** | | |

प्रस्तुत क्रमांक ३ मध्ये नागपूर शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे लिंग व त्यांना परत शिकायची संधी मिळाली तर शिकणार का? या घटकांदरम्यान असलेल्या संबंधांचे विश्लेषणाचे परिणाम दर्शविण्यात आले आहे. प्रस्तुत सारणी ही द्विचलीय आहे. रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे लिंग हे स्वतंत्र चल असुन त्यांनापरत शिकायची संधी मिळाली तर शिकणार का? हे अवलंबित चल आहे सारणीत स्वतंत्र व अवलंबित या दोन्ही चलांना प्रत्येकी दोन व दोन गटात विभागण्यात आले आहे. नागपूर शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे लिंग व त्यांना परत शिकायची संधी मिळाली तर शिकणार का? या चलादरम्यान असलेल्या संबंधांचा आढावा काई वर्ग चाचणीच्या मदतीने घेतला असता असे निदर्शनास आले की, सारणीत १ स्वतंत्र्यांशावर काई वर्ग मुल्य९५.७४ असुन १ स्वातंत्र्यांश व०.०५ सार्थकता स्तरावर मानक काई वर्ग मुल्य ३.८४ आहे. वरील माहिती वरून हे स्पष्ट होते की, सारणीतील काई वर्ग मुल्य हे मानक काई वर्ग मुल्यापेक्षा अधिक आहे. यावरून नागपूर शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे लिंग व त्यांना परत शिकायची संधी मिळाली तर शिकणार का? या चलांदरम्यान महत्वपूर्ण संबंध असल्याचे स्पष्ट होते

## निष्कर्ष

नागपूर शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या बहुतांश मुलांना समाज व त्यांच्या कुटुंबाकडून सहानुभूतीची अपेक्षा आहे.मुलांना . बहुतांश मुलांना परत .शिकायची संधी मिळाल्यास शिकण्यास तयार नाहीत मुले परत .सरकारकडून निवास व्यवस्थेची अपेक्षा आहे शिकायची संधी मिळाल्यास शिकून वकील व्हायचे आहे .

- नागपूर शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे लिंग व त्यांची व्यसनाधीनता या चलांदरम्यान महत्वपूर्ण संबंधआहे.
- नागपूर शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे लिंग व त्यांची दररोजची कमाई या चलांदरम्यान महत्वपूर्ण संबंधआहे.
- नागपूर शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांचे लिंग व त्यांना परत शिकायची संधी मिळाली तर शिकणार का? या चलांदरम्यान महत्वपूर्ण संबंधआहे.

## संदर्भ :


1) 248 children in Nagpur are living on streets, Maharashtra tops list with 4,952. (2022, February 23). Nagpur Today□: Nagpur News. https://www.nagpurtoday.in/248-children-in-nagpur-are-living-on-streets-maharashtra-tops-list-with-4952-2/02231540
2) 248 children in Nagpur are living on streets, Maharashtra tops list with 4,952. (2022, February 23). Nagpur Today□: Nagpur News. https://www.nagpurtoday.in/248-children-in-nagpur-are-living-on-streets-maharashtra-tops-list-with-4952-2/02231540
3) Ackoff, R.L., The Design of Social Research – University of Chicago Press-Chicago, London, p.11.
4) ActionAid India. (2013). Making Street Children Matter. Retrieved from https://www.actionaidindia.org/publication/making-street-children-matter/
5) ActionAid India. Making Street Children Matter [Internet]. 2013 [cited 2018 Aug 25]. Available from: https://www. actionaidindia.org/publication/making-street-childrenmatter/
6) Aderinto, A. A. (2000, September). Social correlates and coping measures of street-children: a comparative study of street and non-street children in South-Western Nigeria. Child Abuse & Neglect, 24(9), 1199–1213. https://doi.org/10.1016/s0145-2134(00)00172-1
7) Afrose, T. (2018). Risk Behaviors of Street Children in Dhaka City, Bangladesh: A Cross Sectional Study. Open Access Journal of Microbiology & Biotechnology, 3(2). https://doi.org/10.23880/oajmb-16000130
8) Anthony, D. (2012, January 1). The State of the World's Children 2012. http://books.google.ie/books?id=MjLJzgEACAAJ&dq=An+economic+study+of+the+quality+of+life+of+street+children+in+Nagpur+city&hl=&cd=3&source=gbs_api
9) Aptekar L, Stoecklin D (2014). Street children and homeless children: A cross-cultural perspective. New York, NY: Springer.
10) Aptekar, L., & Stoecklin, D. (2013, November 18). Street Children and Homeless Youth. Springer Science & Business Media.

http://books.google.ie/books?id=7gXFBAAAQBAJ&printsec=frontcover&dq=quality+of+life+of+street+children&hl=&cd=1&source=gbs_api

11) Atwar B, Engkus K (2020). Violent language in the environment of street children singer-beggars in Heliyon 6(8). Available at: DOI: https://doi.org/10.1016/j.heliyon.2020.e04664
12) Bar-On A (1997). Criminalising Survival: Images and Reality of Street Children. In Journal of Social Policy 26(1). Available at: DOI: https://doi.org/10.1017/S0047279496004928
13) Beazley H (2000). Home Sweet Home? Street Children's Sites of Belonging. In S. L. Holloway and G. Valentine (editors) Children's Geographies: Playing, Living, and Learning. London: Routledge.
14) Bhattacharya, T., Gupta, S., & Ray, S. (2017). Socio-economic Determinants of Child Labour in Nagpur, Maharashtra. International Journal of Applied Research, 3(1), 81-84.